# ऑटोबायोग्राफी ऑफ अ योगी

**स्वामी परमहंस योगानंद**

अनुवाद

**अंजली गोखले**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**ऑटोबायोग्राफी ऑफ अ योगी :** स्वामी परमहंस योगानंद
अनुवाद : अंजली गोखले

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
अंजली दिलीप गोखले
चैतन्य अपार्टमेंट, वाटवे गल्ली,
ब्राह्मणपुरी मिरज - ४१६४१०
फोन नं. ०२३३-२२२६३९८ मो. नं. : ९२७२४९६३८५

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ५००/-

## *लेखकाचे ऋणनिर्देष*

मी, या पुस्तकाचे हस्तलिखित करण्यासाठी मोठी मदत केल्याबद्दल मिस एल. व्ही. प्रॅट (तारा माता) यांचा शतश: ऋणी आहे. त्याचबरोबर, मि. सी. रिचर्ड राईट यांनी, त्यांच्या 'भारत यात्रा रोजनिशी'मधून निवडक उतारे घेण्याची परवानगी दिल्याबद्दल त्यांचेही आभार मानतो. मी, डॉ. डब्ल्यू. वाय. इव्हॅन्स वेंटझ यांचाही, प्रस्तावना लिहिल्याबद्दल एवढेच नाही, तर त्यांनी दिलेल्या सल्ल्यांसाठी आणि प्रोत्साहनांसाठीसुद्धा आभारी आहे.

परमहंस योगानंद
२८ ऑक्टोबर १९४५
एनसिनिटास, कॅलिफोर्निया.

माझे परम आराध्य ईशकृपापापात्र, परमपूज्य गुरू श्री श्री स्वामी युक्तेश्वर गिरीजी महाराज यांचे चरणी समर्पित–

✦✦✦

# प्रस्तावना

डब्ल्यू. वाय. इव्हॅन्स वेंटझ्, एम. ए. डी. लिट, डी.एस.सी.
जीजस कॉलेज, ऑक्सफर्ड, 'तिबेटन योग अॅण्ड सीक्रेट डॉक्ट्रिन्स', 'तिबेटस् ग्रेट योगी मिलरेपा' 'दि तिबेटन बुक ऑफ दि डेड्' वगैरे पुस्तकांचे लेखक-ग्रंथकार.

योगानंदांच्या या आत्मचरित्राचे महत्त्व एका दृष्टीने आणखीनच वाढलेले आहे. ते महत्त्व असे- इंग्लिश भाषेमध्ये अशी पुस्तके खूपच थोडी आहेत. हे पुस्तक भारतामधील अनेक सिद्धपुरुषांच्या खऱ्या हकिकतीवर आहे. ते कोणी वृत्तपत्रव्यावसायिकाने किंवा परकीय लेखकांनी लिहिले नाही. या पुस्तकाचा लेखक हा त्या सिद्ध पुरुषांपैकीच एक असून त्याची योगसाधनाही तशीच आहे. या पुस्तकामध्ये अर्वाचीन कालातील हिंदू संत पुरुषांच्या, प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेल्या, अनुभवलेल्या हकीकती, त्यांच्या विलक्षण जीवनक्रमाचे आणि त्यांच्या सिद्धीसामर्थ्याचे वर्णन आहे. त्यामुळे या पुस्तकाचे महत्त्व केवळ आजच नाही, तर अनंत काळ टिकणारे असे आहे.

या पुस्तकाच्या प्रसिद्ध लेखकाशी भारतात आणि अमेरिकेमध्ये माझा परिचय झाला होता. हे मी माझे महद्भाग्य समजतो. लेखकाच्या या असामान्य कृतीचे वाचकाने कौतुक करावे आणि त्याबद्दल आपली कृतज्ञता दर्शवावी, लेखकाच्या या लोकविलक्षण जीवनपटाची खरोखरच अशा ग्रंथांमध्ये गणना होते की, जे हिंदुमात्राच्या मनाचे आणि हृदयाचे, अंतरंगाचे मोठ्या प्रमाणावर योग्य दिग्दर्शन करून देतात आणि जे ग्रंथ भारताची आध्यात्मिक संपत्ती किती उच्च कोटीची आहे हे व्यक्त करतात. पाश्चिमात्त्य जगात असे ग्रंथ क्वचितच प्रसिद्ध होतात.

या जीवनचरित्रात ज्या संत-महात्म्यांचे वर्णन आले आहे. त्यांपैकी श्री युक्तेश्वर गिरी, यांच्या दर्शनाचे सद्भाग्य मला लाभले होते. माझ्या 'तिबेटन योग

ॲण्ड सीक्रेट डॉक्ट्रिन्स या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर जे चित्र दिले आहे त्या चित्रात या पूजनीय संतमहात्म्याचे मुखचित्र आले आहे. श्रीयुक्तेश्वरांशी माझी भेट, बंगालच्या उपसागराच्या किनाऱ्यावर ओरिसामध्ये पुरीला झाली. समुद्रकिनाऱ्यावरील एका प्रशस्त प्रशांत आश्रमाचे ते त्यावेळी प्रमुख होते. तेथील काही प्रमुख शिष्यांना आध्यात्मिक साधनेचे शिक्षण देण्याचा त्यांचा मुख्य उद्देश होता. परमहंस योगानंद हे त्यांचे प्रमुख शिष्य. त्यांच्यावर त्यांचे नितांत प्रेम होते. त्यांनी योगानंदांना १९२० मध्ये दूत प्रचारक म्हणून पश्चिमेकडे पाठवले. कॅलिफोर्नियासारख्या दूर भागात चाललेल्या कार्याबद्दल त्यांनी मला खूप प्रश्न विचारले.

श्रीयुक्तेश्वरांचा चेहरा, आवाज सौम्य होता. त्यांच्या सहवासात आनंद वाटायचा. त्यांचे शिष्य, त्यांच्याबद्दल सहज उत्स्फूर्तपणे जो आदर दाखवीत, तो योग्यच होता. मला त्यांची ती उंच, सडपातळ, सर्वसंगपरित्याग करून, इहलोकीच्या सर्व वासनांचा त्याग करून भगवी वस्त्रे परिधान केलेली, आश्रमाच्या दारात माझे स्वागत करण्यासाठी उभी राहिलेली मूर्ती, स्पष्ट आठवते, त्यांचे केस लांब, किंचित कुरळे होते. चेहऱ्यावर दाढी होती. त्यांचे शरीर पीळदार पण शरीरयष्टी सडपातळ होती. त्यांची चालही डौलदार होती.

पुरीसारख्या पवित्र शहरामध्ये त्यांनी भूलोकातील आपल्या वास्तव्याचे निवासस्थान निवडलेले होते. पुरीला दररोज असंख्य हिंदू यात्रेकरू भारताच्या कानाकोपऱ्यांतून प्रत्येक प्रांतातून जगन्नाथाच्या दर्शनाला येत असतात. १९३६ मध्ये पुरीलाच श्रीयुक्तेश्वरांनी क्षणभंगूर शरीराच्या देखाव्यापासून आपले मानवी डोळे कायमचे मिटले आणि देहत्याग केला. ही जाणीव घेऊन की, त्यांचे हे अवतरण यशस्वीपणे पुरे झाले आहे.

श्रीयुक्तेश्वरांच्या उदात्त व्यक्तिमत्त्वाबद्दल आणि पावित्र्याबद्दल माझी जी खात्री झाली होती ती सांगायला मला फार आनंद वाटतो आहे. जनसंपर्कापासून लांब राहून त्यांनी नि:संकोचपणे आणि एकांतात शांततापूर्ण असे एक आदर्श जीवन व्यतीत केले. जसे त्यांचे शिष्य परमहंस योगानंद यांनी भावी युगांसाठी वर्णन केले आहे.

✦✦✦

## *स्वामी क्रियानंद (जे डोनाल्ड वाल्टर्स) यांची छोटी प्रस्तावना*

परमहंस योगानंदांचे पुस्तक वाचूनच मी त्यांना भेटलो. मला आवर्जून सांगावेसे वाटते की, हे पुस्तक शोधून काढल्यावर मला आश्चर्याचा धक्का बसला. न्यूयॉर्कच्या एका पुस्तकांच्या मोठ्या दुकानामध्ये बालिशपणे बसले होते. त्यावेळी ते पुस्तक, माझे पूर्ण आयुष्य चांगल्या तऱ्हेने बदलून टाकेल, याची मला जरासुद्धा कल्पना नव्हती.

त्यावेळी १९४८ मध्ये, उन्हाळ्याचा शेवट होता. सत्य म्हणजे काय हे समजून घेण्यासाठी मी उतावीळ झालो होतो. माझ्या अवतीभोवतीचे वातावरण, परिस्थिती सगळी चांगली असून माझे कशात लक्ष नव्हते. मी अस्वस्थ होतो. माझे वडील भूगर्भशास्त्रज्ञ असून एका मोठ्या तेलाच्या कंपनीत मोठ्या हुद्यावर होते. माझी आई समाजसेवा करण्यात संतुष्ट होती. ते दोघेही अगदी आदर्श पालक होते. त्यांचे एकमेकांवरचे प्रेम आणि आदरभाव इतर मित्रमंडळींनाही स्फूर्तिदायक होता.

असे सगळे छान असूनही मी आनंदी नव्हतो. मला असे वाटत असे की, लग्न छान ऊबदार घर, गोड संसार, चांगली नोकरी, मित्रमंडळी यापेक्षाही काही तरी वेगळे असे मला माझ्या आयुष्यात हवे आहे. त्यासाठी मी खूप दुःखी होतो. मला परमेश्वर हवा होता; पण त्याला कसे, कुठे शोधायचे याबाबतीत काहीच माहिती नव्हते.

ते सगळे मला मिळालं, जेव्हा मी हे पुस्तक वाचलं. ते वाचल्यावर मला खूप सुखद असा अनुभव मिळाला. 'जसजसे हे पुस्तक मी वाचत गेलो, तसतसा मी अश्रू आणि हसू यामध्ये न्हाऊन निघत होतो. अश्रू होते ते आनंदाश्रू आणि हसू होते ते परमानंदाचे! आता माझ्या लक्षात आले की, मला ज्याची आत्यंतिक ओढ होती, त्या परमेश्वराला भेटलेली त्या ईश्वराशी तादात्म्य पावलेली व्यक्ती मी मला मिळाली आहे.'

ताबडतोब मी अमेरिकेला जाणारी विनाथांबा बस पकडली. चार दिवस आणि चार रात्र, अखंड प्रवास करून, लॉस एंजेलसला मी आले, ज्या ठिकाणी ती व्यक्ती राहत होती. त्यांना भेटल्यावर मी काय बोलणार होतो, हे माझे मलाच समजत नव्हते. गुरू, योगा, कर्म, असे अनेक शब्द, जे आता माझ्या आयुष्याचे अविभाज्य घटक बनले आहेत, त्यावेळी ते मला काही माहिती नव्हते. ते भेटता क्षणी माझ्या तोंडातून जे शब्द स्फुरले ते म्हणजे, ''मला तुमचा शिष्य होण्याची इच्छा आहे.''

मला नक्की खात्री होती की, ज्याची मला आत्यंतिक गरज होती, त्याचे मार्गदर्शन करणारे, माझ्यासमोर आहेत.

त्यांनी माझा शिष्य म्हणून स्वीकार केल्यावर, माझा आनंद गगनात मावेना. दयेने परिपूर्ण असलेल्या त्यांच्या आयुष्याच्या महाकाव्यात, त्या दिवशी आणखी एका मोजता न येणाऱ्या, अनाकलनीय पुराव्याची भर पडली. त्या दिवशी त्यांनी माझ्यासारख्या कच्च्या, अननुभवी, नवशिक्या, बावीस वर्षांच्या तरुणाला, ज्याला पारमार्थिक मार्गावरील काहीही माहिती नाही; पण शिकण्याची समजून, घेण्याची जबरदस्त ओढ आहे, अशा शिष्याला पदरात घेतले. आपल्याला केवढे मोठे शिवधनुष्य उचलायचे आहे, याची त्यांना कल्पना आली असावी. तरिही त्यांनी, या मातीच्या गोळ्याचे रूपांतर, एका योग्यामध्ये करण्याचा निर्धार केला.

माझे स्वत:चे आयुष्य आणि परमेश्वराच्या या थोर लेकराच्या सहवासातील दिवस यांचा या योगी पुरुषाच्या आत्मचरित्राशी खूप जवळचा संबंध आहे. वाचकांनी ते मनापासून वाचावे अशी मी त्यांना विनंती करतो.

आतापर्यंत मला माहिती असलेल्या थोर लोकांपेक्षा, परमहंस योगानंद हे 'पुरुषोत्तम' आहेत. त्यांच्या सान्निध्यात असणाऱ्या सर्वोच्य मनामध्ये परमहंसजींबद्दल पूज्यभाव, आदरभाव आहे.

जितका प्रदीर्घ काळ मी त्यांच्याबरोबर घालवला आहे, जेवढा सहवास मला मिळाला आहे, तेवढ्या प्रत्येक दिवशी मला 'चमत्कार' मला अनुभवायला मिळाला आहे.

प्रिय वाचकहो, जर तुम्ही तुमच्या आयुष्यामध्ये काही चांगला बदल व्हावा, अशी इच्छा करत असाल, तर हे पुस्तक वाचा. मी शपथपूर्वक सांगतो, तुमची अजिबात निराशा होणार नाही. उलट आयुष्याबद्दलच्या एक सकारात्मक आनंद तुम्हाला अनुभवायला मिळेल.

मी, परमहंस योगानंदांना छपन्न वर्षांपूर्वी भेटलो. अगदी तेव्हापासून मी त्यांचा शिष्य आहे आणि रोज मला असे जाणवते की, त्यांनी संपूर्ण जगासाठी जे केले आहे, दिले आहे, ते म्हणजे मानवाची गरज आहे. मानवाला आपले आयुष्य जगता जगता, अध्यात्म आणि परमार्थाच्या मार्गावर, क्रियायोगाच्या साहाय्याने पैलतीरावर नेणारा ज्ञानदीप आहे, योगदीप आहे.

✦✦✦

## *भावसुमनांची ओंजळ*

'परमंहस योगानंद' या भारतातल्या योगी पुरुषाच्या आत्मचरित्राचे इंग्रजीमधून मराठीत भाषांतर करण्याची संधी मला श्री. शितल मेहता, यांनी दिली, याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार! श्री. परमहंस योगानंद, श्री. स्वामी विवेकानंद यांच्या इतकेच योग्यतेचे होते. या पुस्तकाचा अनुवाद करताना मला आत्मिक आनंद आणि अपूर्व समाधान मिळाले.

श्री. योगानंद, त्यांचे गुरू श्री युक्तेश्वर, त्यांचे परमगुरू श्री लाहिरी महाशय आणि त्या सर्वांचे अमर गुरूदेव 'बाबाजी' या सर्वांची ओळख झाली आणि त्यांच्या कृपाप्रसादाने, आशीर्वादानेच हे अनुवादाचे काम पूर्ण होऊ शकले. वाचकांनी श्रद्धेने आणि मनापासून हे पुस्तक वाचले, तर त्यांनाही तो आनंद, नक्कीच मिळेल.

अनुवादाचे हे काम पूर्ण झाल्यावर, माझ्याकडून एक सात्त्विक काम झाल्याचे आनंदाश्रू आणि वाचन-लिखाण संपले म्हणूनही वाईट वाटले. या सर्व गुरुदेवांपैकी 'बाबाजी' हे अमर आहेत. आपल्यापैकी ज्यांची योग्यता असेल, श्रद्धा असेल, विश्वास असेल, त्यांना अजूनही ते येऊन नक्की आशीर्वाद देतील. याची खात्री वाटते. फक्त आपण तेवढे 'लायक' बनले पाहिजे.

पुन्हा एकदा रिया पब्लिकेशन्स् कोल्हापूरचे श्री. शितल मेहता सरांचे माझ्यावर विश्वास टाकून 'परमहंस योगानंद' यांच्या आत्मचरित्राचा अनुवाद करवून घेतल्याबद्दल, कृतज्ञतापूर्वक आभार!

✦✦✦